सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमासाठी सामाजिक विशेष घटकाकरिता सन २०१६-१७ चा केंद्र हिश्श्याच्या दुसऱ्या हप्त्याची रु.७४४.५८ लक्ष व त्या समरुप राज्य हिस्सा रु.४९६.३८ लक्ष इतका निधी वितरीत करण्याबाबत......

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः साआवि- ३००११/प्र.क्र.९९३/२०१६/आरोग्य-७

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
संकुल इमारत, १० वा मजला, मंत्रालय, मुंबई ४००००१.
दिनांक : २२ मार्च, २०१८

वाचा :-

१) केंद्र शासन, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. No. L-१९०१५/९/२०१६-TB (Pt.), दिनांक २७ मार्च, २०१७.

२) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.राआसोम/एफएमजी/कें.रा.हि./२४७९८-८०४/२०१७-१८, दिनांक २३ जून, २०१७.

प्रस्तावना :-

सन १९६२ पासून देशात राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम राज्यांमध्ये १९९८-९९ पासून टप्प्या-टप्प्याने राबविण्यात येत आहे. हा कार्यक्रम राबविण्यासाठी राज्य क्षयरोग नियंत्रण सोसायटी व ६० जिल्हा/शहर क्षयरोग नियंत्रण सोसायटींची स्थापना करण्यात आली आहे. या कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :

अ) कमीत कमी ९०% नवीन थुंकी दुषित क्षयरोग रुग्णांना बरे करणे व हा दर कायम राखणे.

ब) अपेक्षित क्षय रुग्णांपैकी किमान ९०% रुग्ण शोधणे व हा दर कायम राखणे.

सदर कार्यक्रमाला सन २०१३-१४ पर्यंत केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी परस्पर अंमलबजावणी अधिकाऱ्यांना प्राप्त होत होता. त्यामुळे सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय मान्यता घेण्यात आली नव्हती. सन २०१४-१५ पासून केंद्र शासनाने निधीच्या वितरणाबाबत धोरणात्मक बदल केला असून आता केंद्र शासनाचा निधी यापुढे राज्य शासनाच्या

कोषागारात जमा होणार असून सदर निधी अर्थसंकल्पित केल्यानंतर त्याचे वाटप संबंधित कार्यक्रम अंमलबजावणी अधिकाऱ्यांना करण्यात येणार आहे. सन २०१४-१५ पासून केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाचा समावेश करण्यात आला असून कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरीता केंद्र शासन आणि राज्य शासन यांचे निधीचे प्रमाण ७५:२५ असे होते. तसेच, सन २०१५-१६ पासून केंद्र शासनाने सदर प्रमाण ६०:४० असे केले आहे. सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरीता निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राज्य व जिल्हा स्तरावरील करार तत्त्वावरील कर्मचाऱ्यांचे वेतन, वैद्यकीय महाविद्यालयावरील खर्च, वाहनाची देखभाल व दुरुस्ती, भाडेतत्त्वावर वाहन घेणे, कार्यालयीन खर्च/संकीर्ण खर्च, एम.डी.आर.टीबी व एम.डी.आर. संशयित रुग्णांचा जाणे येण्याचा खर्च व थुंकी नमुना पाठविण्याचा खर्च तसेच Supervision & Monitoring इत्यादी बाबींवरील खर्च भागविण्यासाठी सन २०१७-१८ या वित्तिय वर्षासाठी सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमासाठी सामाजिक विशेष घटकाकरिता (SCSP) ६०% केंद्र हिस्सा व ४०% राज्य हिस्सा पुढीलप्रमाणे वितरीत करण्यात येत आहे.

(रू. लाखात)

अ. क्र.	**सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम**	**मंजूर अनुदान ६०% केंद्र हिस्सा (२२१०F५१३)**	**समरुप ४०% राज्य हिस्सा (२२१०५२२)**
1.	Flexible Pool for communicable Diseases under Revise National TB control programme	७४४.५८	४९६.३८
	एकूण	**७४४.५८**	**४९६.३८**

२. उपरोक्त अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचे देयक कोषागारात सादर करून विहित केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी

यांच्याकडे सुपुर्द करावी. यासाठी सह संचालक (अ. व प्र.), आरोग्य सेवा, मुंबई यांना “नियंत्रण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर प्रस्तावावरील खर्च मागणी क्र.आर-१, २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य; ०६, सार्वजनिक आरोग्य; ७७९- अनुसूचित जातीसाठी विशेष घटक योजना (०१) (०६) सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम (केंद्र हिस्सा ६०%) (२२१०F५१३) - तसेच मागणी क्र.आर-१, २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य; ७८९- अनुसूचित जातीसाठी विशेष घटक योजना (०१) (०७) सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम (राज्य हिस्सा ४०%) (२२१०F५२२) - ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१७-१८ साठी मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. वित्त विभागाच्या क्र.अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ च्या परिच्छेद ७ ते १८ व सोबतच्या परिशिष्टामधील अनु.क्र.८ मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक अटी व शर्तीची पुर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटीच्या लेखापरिक्षणामध्ये कोणतेही गंभीर आक्षेप घेतलेले नाहीत. सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी पुरवठादाराच्या खात्यात थेट जमा होणार आहे. सदर प्रस्तावात वस्तू खरेदी प्रस्ताव तसेच, भांडवली वस्तू खरेदीचा समावेश नाही. सदर कार्यक्रमांच्या संबंधित लेखाशिर्षाखाली एक वर्ष जूने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

५. सदरचे अनुदान सशर्त असून वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्र.२०१३/ प्र.क्र.८५/ २०१३/ अर्थसंकल्प-३, दिनांक २५ एप्रिल, २०१३ नुसार उपरोक्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर केल्यानंतरच पुढील अनुदान वितरीत करण्यात येईल.

६. सदर प्रस्तावावरील खर्च शासन निर्णय, उदयोग उर्जा व कामगार विभाग, दिनांक १ डिसेंबर २०१६ मधील तरतूदीनुसार आवश्यक तेथे करावयाच्या खरेदीबाबत प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.

७. सदर शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सहमतीने तसेच त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२३९२०१७, दिनांक ०५/१२/२०१७ तसेच वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ५०८/अर्थोपाय, दिनांक २७ डिसेंबर, २०१७, अनौपचारीक संदर्भ क्रमांक ४९४/व्यय-१३, दिनांक १९ डिसेंबर, २०१७ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२११३३००७४६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Amol Nilakanth Sakharkar

Digitally signed by Amol Nilakanth Sakharkar
DN: CN = Amol Nilakanth Sakharkar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Agriculture Animal Husbandry dairy and Fisheries Department
Date: 2018.03.22 14:49:25 +05'30'

(अ. नि. साखरकर)
अवर सचिव

प्रति,

आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

प्रत,

१. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
३. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
४. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे .
५. सहाय्यक संचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे
६. उपसंचालक (नियोजन), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
९. सहसचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (विघयो), मंत्रालय, मुंबई.
१०. उपसचिव (अर्थोपाय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. कार्यासन अर्थसंकल्प/लेखा, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवडनस्ती (आरोग्य -७) .